REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा धर्म : एक वैश्विक उन्नतीचा मार्ग

डॉ. पल्लवी ताजने

**प्रस्तावना :**



20 व्या शतकात झालेल्या थोर विभूतींमध्ये ज्याचे नाव घ्यावे असे व्युत्पन्न व्यक्तिमत्व म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होय. एक सिद्ध आध्यात्मिक युगपुरूष, निष्काम कर्मयोगाचे प्रेरणास्थान, आत्मोन्नती व ग्रामोन्नतीचे मार्गदर्शक, वैचारिक प्रगल्भतेला कृतीप्रवणतेची जोड देणारे संत म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या विद्‌वत प्रबोधनकाराचा परिचय व्यापक आणि चतुरस्त्र असाच आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी त्या राष्ट्राची मुळं घट्‌ट करण्याचा विचार आणि कार्य हेच राष्ट्रसंताच्या जिविताचा ध्यास झाले आणि या एका ध्यासानेच आपले संपुर्ण आयुष्य राष्ट्राच्या उभारणीसाठी ग्रामसंपन्नतेची गरज दर्शवून ग्रामोन्नती व ग्रामकल्याणासाठी त्यांनी खर्ची केले.

आध्यात्माची जोड असलेली एक कर्मनिष्ठ राष्ट्रसंत आणि कर्मसिद्धांताला मध्यवर्ती स्थान देऊन आयुष्य जगणारी 20व्या शतकातील संतत्वाला गेलेल्या विभूतींपैकी एक राष्ट्रसंत होय. राष्ट्रसंतांनी आध्यात्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रबोधनाचे कार्य आयुष्यभर निष्ठेने केले. आध्यात्मिक मूळ असूनही त्यांनी आधूनिक जिवनमुल्यांची जोड आपल्या आध्यात्मिक जीवनाला दिली आणि याच आद"र्ी जीवनमुल्यांच्या पायांवर राष्ट्रउभारणीचा संकल्प केला. राष्ट्रसंतांनी केलेल्या राष्ट्रउभारणीच्या संकल्पाला कृतीप्रवणतेची जोड दिली. याच त्यांच्या अतुलनीय कार्यामुळे त्यांची किर्तीप्रभा सर्वदूर पोहचली आणि ग्रामीण समाजाचा आत्मा बनली, आणि हे असे अलौकीक असामान्य आणि मातीत राहून मातीचा विचार करणारे व्यक्तिमत्व विदर्भाला लाभले, देशाला लाभले.

राष्ट्रसंतांनी राष्ट्रउभारणीसाठी सुक्ष्मतेपासून व्यापकत्वाचा विचार मांडला आणि या विचारांचे देणे त्यांनी आपल्या साहित्यातून समाजासाठी दिले. याच सुक्ष्मतेपासून व्यापकत्वापर्यंतचा विचार त्याच्या ग्रामगीता या वाङ्मयीन पुर्तीतून होतो. ग्रामगीता ही ग्रामविकासाची संहिता आहे. ज्याप्रमाणे राष्ट्रसंतांचे ग्रामकार्य स्वयंभू आहे त्याचप्रमाणे ते स्वयंभू कार्य ग्रामगीतेत 'स्वानुभव संमत' आहे असा उल्लेख स्वतः राष्ट्रसंतांनी विनोबांजवळ केल्याचा संदर्भ विनोबा ग्रामगीतेच्या प्रस्तावनेत करतात. अशाच प्रकारचा उल्लेख महामहोपाध्याय वा.वि. मिराशी यांनी करून ग्रामगीतेतील विचार हे 'गुरूशास्त्रस्वानुभव संमत' असल्याचे म्हटले आहे. एकंदर राष्ट्रसंतांच्या व्यक्तित्व, व्यासंग, चिंतन, अवलोकन आणि अनुभूतीचे दर्शन त्याच्या ग्रामगीतेतून होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेतून ग्रामोन्नती आणि ग्रामकल्याणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्वच विषयांना सर्वार्थाने हात घातला. सद्‌धर्म मंथन, लोकवशीकरण, ग्रामनिर्माण, दृष्टिपरिवर्तन , संस्कारशोधन, प्रेमधर्मस्थापन, देवत्वसाधन, आदर्शजीवन या सर्व विषयावर

विस्तृतपणे निवेदनात्मक मार्गदर्शन केले आहे. ग्रामगीतेबद्दल असेच म्हणता येईल की ग्रामगीता आदर्श ग्रामसंस्कृतीचे नितळ रूप होय. ग्रामगीतेतून राष्ट्रसंतांनी धर्माच्या सुक्ष्म विचारापासून विश्वधर्मापर्यंतची व्यापकता मांडली आहे.

धर्म हा शब्द 'धृ' या धातूपासून व्युत्पन्न झाला आहे. 'धर्म' म्हणजे धारण करणे, पोषण करणे किंवा टिकवून धरणारे तत्त्व म्हणजे धर्म होय. 'धरति लोकान् धियते पुण्यात्माभि : इति वा' = जो लोकांना धारण करतो किंवा जो पुण्यात्मा पुरूषाकडून धारण केला जातो तो धर्म होय ? 1 एकंदर मानव समाजाच्या कल्याणासाठी सद्विचारी तत्त्वाचे योग्यरितीने पालन करणे म्हणजे धर्म होय.

धर्माच्या या साध्या–सोप्या मार्गाला कालांतराने क्लिष्टता आली. उच्च व उदात्त अशा धर्माच्या संकल्पनेची आणि त्याच्या तत्त्वज्ञानाची जागा पुढे संकुचित विचारांनी घेतली आणि धर्म जगातील सर्व मानवजातीसाठी न राहता एका विशिष्ट समुदायापुरता मर्यादित झाला आणि जगात अनेक धर्म अस्तित्वात आले परंतू या सर्व धर्माचे तत्त्वज्ञान हे वैश्विक मानव जातीच्या कल्याणाचाच संदेश देणारे होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जगातील विभिन्न धर्माविषयी बोलतांना म्हणतात की,

'जगी दिसती विभिन्न धर्म। परि सर्वांचे एकचि वर्म।
विश्वधारणेचा मार्ग उत्तम। सद्धर्म तोचि।।' 2

जगी वेगवेगळे धर्म अस्तित्वात असले तरी सर्व धर्माचे वर्म किंवा सार एकच आहे आणि सर्व धर्माने सांगितलेला विश्वधारणेचा मार्गच उत्तम आहे असे राष्ट्रसंत ग्रामगीतेत म्हणतात. धर्म या संकल्पना ग्रामगीतेच्या दुसऱ्या अध्यायात राष्ट्रसंत विस्तृतपणे सांगतात. याच धर्मावर ग्रामगितेच्या अठ्ठाविसाव्या अध्यायात विश्वधर्म संकल्पनेअंतर्गत धर्माच्या मूळ गाभ्यावर वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ निरूपण केले आहे.

जगात निर्माण झालेल्या स्वार्थी भावनेमुळे निरनिराळ्या समुदायांनी धर्म या शब्दाचा आपआपल्या सोयीनुसार व स्वार्थानुसार अर्थसंकोच केला. हाच अर्थसंकोच काढून टाकून धर्माला व्यापकत्व, वैश्विक अर्थ देण्याचे कार्य राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत केले. आज जे–जे धर्म अस्तित्वात आहेत ते धर्म नसून फक्त उपासना मार्ग असल्याचे ते सांगतात आणि या सर्व उपासना मार्गाचे अंतिम आणि महत्त्वाचे ध्येय मानवकल्याण हेच आहे असा राष्ट्रसंताचा विश्वास आहे. म्हणूनच खऱ्या धर्माचा हेतू सांगताना ते म्हणतात की,

''जगासि सुखी उन्नत करावे। हेचि त्या जगन्नियंत्या रूचावे।
मग धर्माचे रूप याहूनि असावे। भिन्न कैसे?।।'' 3

अशाप्रकारे सर्व धर्माचा किंवा उपासना मार्गाचा अंतिम उद्देश हा मानव कल्याण आणि मानव उन्नती असल्याने संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाची संकल्पना असलेल्या मानव धर्माचा हेतू वेगळा असूच शकत नाही. धर्माचा हेतू सर्व जगाला सुखी व उन्नत करण्याचाच असतो. म्हणूनच राष्ट्रसंत धर्माला 'विश्वधर्म' म्हणतात आणि त्याला वैश्विक पातळीवर नेतात.

राष्ट्रसंतांना सर्व मानवजातीचा एकच धर्म अभिप्रेत होता आणि म्हणूनच राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत वर्णन केलेल्या विश्वधर्मात आज अस्तित्वात असलेल्या सर्व धर्माचे सार सामावले आहे. राष्ट्रसंत म्हणतात की,

'व्हावी विश्वाची उत्तम धारणा।शांती लाभावी सर्व जना।
या एकाच उद्देषाने प्रयत्न नाना। केले धर्मप्रवर्तकांनी।।' 4

जगात अस्तित्वात असणाऱ्या धर्माच्या प्रवर्तकांनी सकल मानवजातीच्या कल्याणासाठी आपला धर्मोपदेष दिला. महंमद पैगंबर, येशू ख्रिस्त, बुद्ध, वर्धमान महावीर, श्रीकृष्ण, झरतुष्ट्र यांचे उपदेष हे एका विशिष्ट प्रदेषापुरते वा देशापुरते नव्हते तर अखिल मानवजातीच्या सुखासाठी होते. आणि त्यातूनच जगभरात जो आध्यात्मिक संत परंपरेचा प्रवाह पुढे चालू राहिला त्या सर्वांनी 'चिंता वाहतो विश्वाची' हेच आपल्या आयुष्याचे ध्येय बनविले.

राष्ट्रसंत ग्रामगीतेत वर्णीत करित असलेला धर्म हा लौकिक आणि पारमार्थिक अशा अलौकिक विस्ताराचा विश्वधर्म आहे. ग्रामगीतेतील दुसऱ्या अध्यायात जे जे नैतिक मुल्यांना धरून कर्मसिद्धांताच्या मार्गाने जाते तो धर्म होय आणि असे सांगत असताना राष्ट्रसंत नैतिक मुल्यांच्या आधारे पालन करावयाचा व्यक्तिधर्म, कुटुंबधर्म, समाजधर्म, गावधर्म, राष्ट्रधर्म आणि विश्वधर्माचा प्रवास सांगून संपूर्ण विश्वाची काळजी वाहतात. राष्ट्रसंतांच्या विश्वधर्माचा मानवी मुल्यांशी अतिशय घनिष्ठ संबंध आहे. विश्वधर्म हा मानवतेच्या पायावर उभा असतो. मानवाने नैतिक मुल्यांचे पालन केले तर धर्म हा राष्ट्रसंतांना अभिप्रेत असलेल्या विश्वात्मक पातळीवर जातो. यासाठी ते ग्रामगीतेत पुढील ओळी सांगतात.

'अनेक प्राणी जेथे राहती। त्या सर्वांची राहावी सुस्थिती।
समाज समाधानाची गती। त्यास धर्म म्हणावे।।' 5

खऱ्या अर्थाने चिंतनीय आहे. प्रत्येक मनुष्यातील वेगळेपणा स्विकारून त्याच्या आचार आणि विचाराप्रति आदरभाव ठेवून त्याच्याशी उत्तम आचरण असणे हाच खरा धर्म होय. धर्माबद्दल सांगताना राष्ट्रसंत एके ठिकाणी अतिशय मार्मिक विवेचन देतात.

'नको सत्तेचा बडगा त्यासि। नको दंडभय सत्कर्मासि।
आपापले कर्म सर्वांसि। धर्म शिकवी सर्वांगे।।
धार्मिक त्यासि म्हणावे। सत्तेवाचूनि वागे बरवे।
स्वये आपुल्याचि स्वभावे। समरसे होई सर्वांशी।।' 6

कर्मसिद्धांत आणि सर्वांप्रति समरसता हा धर्मपालनाचा उत्तम मार्ग असल्याचे ते म्हणतात आणि अशा या धर्मपालनात कुठल्याही सत्तेचा धाक किंवा शिक्षेचे भय न ठेवता निर्भिडपणे जगणे राष्ट्रसंतांना अभिप्रेत आहे.

धर्माचे हे व्यापकत्व वर्णन करताना जगात मानवांनी आपल्या स्वार्थी भावनेमुळे धर्म या शब्दाचा अर्थसंकोच केला याची सलही राष्ट्रसंत आपल्या लिखाणातून मांडतात.

'लोक धर्माची व्याख्याच विसरले। धर्म हिंदू–मुसलमान झाले।
मूळचे मानवपणहि आपुले। हरविले त्यांनी।।' 7

अशाप्रकारे सर्व मानवजातीचा एकच धर्म ही धर्माची व्याख्या लोक विसरून समुहात वाटले गेले आणि त्यामुळे आपली माणुसकी सुद्धा त्यांनी हरविल्याची खंत राष्ट्रसंतांना वाटते. विशिष्ट समुदायापुरता, देशापुरता, भुभागापुरता धर्म संकुचित केलेल्या लोकांसाठी राष्ट्रसंत धर्माच्या उन्नतीचा जागतिक पातळीवरील विचार मांडतात त्यासाठी ते म्हणतात,

'देश भाषेचे बुरखे घातले। हवा, पाण्याने रिवाज बदलले।
त्या बहिरंगासीच धर्म म्हणो लागले। अल्पज्ञानी।।' 8

देश, भाषा, प्रथा, परंपरा, हवामान या बाह्यरंगालाच माणूस धर्म मानत असेल तर तो प्रगल्भ नसून अल्पज्ञानी आहे. या बाह्यरंगाला धर्म मानल्यामुळे धर्माच्या नावावर हिंसा, द्वेष, वैरभाव, फुटीरवृत्ती बळावली. यातूनच माणसे एकमेकांशी भांडू लागली, जे राष्ट्रसंतांना अभिप्रेत नाही.

राष्ट्रसंतांना अभिप्रेत आहे, आखिल विश्वाचा एक धर्म – मानव धर्म, सत्य, न्याय, नीती, समता, बंधुता यावर आधारित धर्म, सेवापरायत धर्म, आणि म्हणून ते म्हणतात,

'जो कोणी सत्य सिद्धान्ती। ज्याची विश्वव्यापी प्रीति, मती।
तो असो कोणत्याही धर्म, जमाती। समजावा चित्ती आपुलाचि।।' 9

असा सत्याच्या सिद्धांतावर चालणार, विश्वव्यापी प्रेमाची भाषा करणारा मग तो कोणत्याही धर्म, जमातीचा असो आपला समजावा. हाच मानवधर्म राष्ट्रसंत सर्वांना सांगतात.

राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेत धर्माच्या व्यापक संकल्पनेची मांडणी केली आहे. ही संकल्पना ज्याच्यासाठी आहे त्या मानवाला मध्यवर्ती स्थान देऊन राष्ट्रसंत म्हणतात की,

'परि हे विश्व एकचि दल। मानवाचे ।।' 10
हा व्यापक विचार राष्ट्रसंताच्या लेखणीतून आणि कृतीतूनही दिसतो.
किंवा
'मानव हेचि आपुले नाम। मग स्वधर्म म्हणजे मानवधर्म।
हे तरी ध्यानी घ्या सत्य वर्म। साध्या बोली।।' 11

मानवधर्मावर किंवा माणुसकीवर आधारित हाच मानवधर्म राष्ट्रसंतांचा खरा धर्म आहे. धर्माचे अंतिम उद्दिष्ट अखिल मानवजातीचे कल्याण आहे. धर्म हा मानवजातीसाठी आहे, मानवजात ही धर्मासाठी नाही. म्हणून मानवाच्या सर्वांगीण कल्याणासाठी जो इष्ट तोच धर्म हा विचार राष्ट्रसंतांच्या विचारात दिसतो. त्यामुळे मानव धर्माचे पालन करावे असे सांगताना ते म्हणतात,

''धर्माची आखणी मानवता। मानवतेसाठी करावी व्यवस्था।
कोठेही होता अव्यवस्था। धावोनि जावे।।'' 12

मानवधर्माला अनुसरूनच आपली वागणूक असावी असे राष्ट्रसंत म्हणतात.

मानवधर्म हा विश्वात्मक आहे. संपूर्ण विश्वातील मानवजातीचा एकच धर्म आहे. अशी धर्माची वैश्विक संकल्पना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मांडतात. सर्व विश्वाला एका धर्माच्या संकल्पनेत ते नेऊन बसवितात आणि त्याची प्रचिती ग्रामगीतेतील विश्वधर्म, सर्व धर्माचा समन्वय म्हणजे विश्वशांती, सर्व धर्माचे एक वर्म, हाच विश्वधारणेचा उत्तम मार्ग, अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी सांगितलेले सर्व धर्माचे समान तत्त्वज्ञान, अखिल विश्वाचा एक देव, विश्व—एकच दल, अशा वैश्विकतेचा आदर्श सांगणाऱ्या ग्रामगीतेतील शब्दांवरून येते.

अशाप्रकारे अखिल मानवजातीचा एक धर्म मानणारे अवघ्या विश्वाची चिंता करणारे, विश्वाच्या कल्याणासाठी काळजी वाहणारे भारतीय परंपरेतील सर्वच लोक संतत्वाला पोहचले, ते आपल्या विचारांच्या व्यापकतेमुळे आणि राष्ट्रसंत तर आपल्या प्रगल्भ विचारांना कार्याची जोड देणारे होते. व्यक्तित्व आणि कृतित्व यातून विश्वाची चिंता करून संतत्वाचा वसा चालविणारे राष्ट्रसंत खऱ्या अर्थाने संतपरंपरेचे पाईक ठरतात. विश्वकुटूंबाचे विचार त्यांनी आपल्या कृतीत उतरविले व आयुष्यभर याच ध्यासाने ते अविरत कार्य करित राहिले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे इ.स. 1955 साली राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना जपान देशातील टोकीओ येथे विश्वधर्म आणि विश्वशांती परिषदेचे आमंत्रण आले. तीस राष्ट्रांच्या प्रतिनिधींसमोर व सहस्त्रावधी प्रक्षकांसमोर त्यांनी आपले विचार मांडले. या विश्वशांती परिषदेचे उद्घाटन महाराजांच्या हस्ते झाले. या परिषदेत राष्ट्रसंतांनी गायलेल्या भजनातून विश्वधर्माचा एक नवा अध्याय त्यांनी संपूर्ण जगाला शिकविला तो म्हणजे,

''हर देश मे तू, हर वेषमे तू
तेरे नाम अनेक तू एकही है।
तेरी रंगभूमी यह विश्व बना
सब खेलमे—मेलमे तुही तो है।।'' 13

## संदर्भ –

1) सावरकर सुदामजी (संपादक) ग्रामगीता, प्रकाशक – श्रीगुरूदेव आत्मनुसंधान भू वैकुंठ, टेकडी (अड्याळ) ग्रामगीतेवरील थोरांची पुष्पवृष्टी
2) वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – ग्रामगीता, आवृत्ती बाविसावी, प्रकाशक—सुनिल देशमुख, पृष्ठ. क्र. – 255

3) तत्रैव पृष्ठ. क्र. – 256
4) तत्रैव पृष्ठ. क्र. – 255
5) सावरकर सुदामजी (संपादक), ग्रामगीता, प्रकाशक – श्रीगुरूदेव आत्मनुसंधान भू वैकुंठ, टेकडी (अड्याळ) अध्याय दुसरा, पृष्ठ. क्र. – 11
6) तत्रैव, पृष्ठ. क्र. – 11
7) वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज – ग्रामगीता, आवृत्ती बाविसावी, प्रकाशक–सुनिल देशमुख, पृष्ठ. क्र. – 256 अध्याय अठ्ठाविसावा, ओवी क्र. – 32
8) तत्रैव, अध्याय अठ्ठाविसावा, ओवी क्र. – 33 पृष्ठ. क्र. – 256
9) तत्रैव, अध्याय एकोणतीस, ओवी क्र. – 21 पृष्ठ. क्र. – 265
10) तत्रैव, अध्याय अठ्ठाविसावा, ओवी क्र. – 25 पृष्ठ. क्र. – 256
11) तत्रैव, अध्याय एकोणतीसावा, ओवी क्र. – 28 पृष्ठ. क्र. – 266
12) सावरकर सुदामजी (संपादक), ग्रामगीता, प्रकाशक – श्रीगुरूदेव आत्मनुसंधान भू वैकुंठ, टेकडी (अड्याळ) अध्याय अठ्ठाविस, ओवी क्र. – 44, पृष्ठ. क्र. – 254
13) गावडे, प्र.ल., राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला, गंधर्व वेद प्रकाशन, पृष्ठ. क्र. – 102–103


LBP PUBLICATION